ePaper

# “मी सर्वांना कामाला लावलंय”, एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला



वर्ष - 6 । अंक - 349 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- उरुळी देवाची-फुरसुंगी कचरा डेपो झाला पर्यावरणपुरक अन् हिरवागार !
- राज्याच्या राजकारणात नवं वळण!
- 'हिंडेनबर्ग' प्रकरणात जेपीसीची मागणी निरर्थक'

www.mahaenews.com | । शनिवार दि. 8 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पवना, मगर बँक निवडणूक अन् पिंपरी-चिंचवडमधील

# निर्णायक भूमिकेत ‘स्थानिक’च!

**। पिंपरी। महाईन्यूज ।**

**विशेष प्रतिनिधी**

**उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमधील सर्वसामान्य, कष्टकरी नागरिकांची ‘अर्थवाहिनी’ अशी ओळख असलेल्या पवना सहकारी बँक आणि कै. अण्णासाहेब मगर सहकारी बँकेची निवडणूक चुरशीची झाली आहे. बिनविरोध निवडणूक व्हावी, अशी अपेक्षा असताना गावकी-भावकीच्या वादात निवडणुकीचे मैदान गाजणार आहे. यामध्ये बाजी कुणीही मारली, तरी दोन्ही बँकांवर स्थानिक अर्थात गाववाल्या नेत्यांचेच वर्चस्व राहणार हे निश्चित आहे.**

## दि. 9 एप्रिलला मतदान, दि. 10 एप्रिलला लागणार निकाल







शहरात पवना सहकारी बँक ही भूमिपुत्रांची तसेच पाहुण्या-रावळ्यांची बँक म्हणूनही प्रसिद्ध आहे. या बँकेवर माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांचे किंवा त्यांना मानणाऱ्या विचारांचे संचालक मंडळ सर्व काळ सत्ता पदावर राहिलेले आहे. या बँकेची स्थापना शहराचे भाग्यविधाते दिवंगत अण्णासाहेब मगर यांनी केलेली आहे. येत्या ऑगस्ट महिन्यात बँकेला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे हे सर्वांना बरोबर घेऊन जाणारे व सर्व पक्षीयांबरोबर चांगले संबंध असलेले नेतृत्व असल्याने या बँकेची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता होती. मात्र, यावर्षी निवडणूक लागली आहे. ज्ञानेश्वर लांडगे यांच्या नेतृत्वाखाली अण्णासाहेब मगर पॅनेल पवना बँकेच्या निवडणुकीच्या रिंगणात आहे. तर विलास भोईर यांच्या पुढाकाराने पवना प्रगती पॅनेल मैदानात उतरले आहेत. कै. अण्णासाहेब मगर बँकेच्या निवडणुकीसाठी नंदकुमार लांडे यांच्या पुढाकाराने प्रगती पॅनेल निवडणूक लढवत आहे. तर विरोधातील विठ्ठल सांडभोर यांच्या नेतृत्वात सहकार पॅनेल निवडणूक लढवीत आहे. बाळासाहेब गव्हाणे यांनी या बँकेची स्थापना केली आहे. पुणे जिल्ह्यासह अहमदनगर, सोलापूर, सातारा, रायगड व ठाणे येथे कार्यक्षेत्र असलेल्या या बँकेचा भोसरी, चाकण, चिखली, कोरेगाव भीमा, राजगुरूनगर, संगमनेर, आकुर्डी, शिंदेवासुली, दिघी व मांजरी बु॥ असा १० शाखांचा विस्तार झालेला आहे . तसेच, पवना बँक ही पिंपरी-चिंचवड भागातील जुन्या टॉप नागरी सहकारी बँकांपैकी एक म्हणून लोकप्रिय आहे कारण तिच्या प्रचंड प्रगतीमुळे. सध्या ही पिंपरी-चिंचवडमधील झपाट्याने प्रगती करणाऱ्या सहकारी बँकेपैकी एक आहे. चिंचवड, कासारवाडी, भोसरी, पिंपरी, काळेवाडी, आकुर्डी, वाकड, सोमाटणे फाटा, चिंबळी फाटा, रावेत, आळंदी, दापोडी, वाघोली, पाषाण, देहूगाव, वडगाव मावळ, स्पाईन रोड, कामशेत, शिक्रापूर, मारुंजी, इंदुरी आणि चिखली येथे येथे २२ शाखा आहेत.

या निवडणुकीसाठी दोन्ही पॅनेलकडून अत्यंत जोरादार प्रचार सुरू आहे. १० ते १५ हजाराच्या घरात सभासद संख्या असतानाही शहरातील प्रमुख चौकांत फ्लेक्स आणि जाहिरात ‘ब्रँडिंग’ सुरू आहे. त्यामुळे निवडणुकीच्या निकालाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## स्थानिक नेतेच निवडणुकीचे आधारस्तंभ...

**» पिंपरी-चिंचवडमधील राजकारण गावकी-भावकी आणि नातेसंबंधांवर अधारीत आहे. पवना आणि अण्णासाहेब मगर बँकेच्या निमित्ताने पुन्हा एकदा गावकी-भावकीत निवडणूक होणार हे निश्चित झाले. या निवडणुकीत स्थानिक सर्वपक्षीय नेते यांचा जाहिरातींमध्ये ‘आधारस्तंभ’ असा उल्लेख करण्यात आला आहे. यामध्ये भोसरीचे विद्यमान आमदार महेश लांडगे, माजी आमदार विलास लांडे, माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, खेडचे आमदार दिलीप मोहिते-पाटील, मावळचे आमदार सुनील शेळके यांचे फोटो आहेत. त्यामुळे ही निवडणूक कोणीही जिंकली, तरी वर्चस्व स्थानिकांचेच राहणार आहे.**

## आगामी 25 वर्षे स्थानिकच सत्ताधीश...

**» पिंपरी-चिंचवड शहराची स्थापना होवून आता ५० वर्षे झाली आहेत. या काळात स्थानिक नेत्यांनी नेतृत्व केले. स्थानिकांच्या हाता शहराची धुरा राहिली. आणखी किमान २ पिढ्या स्थानिकच शहराचे ‘कारभारी’ राहतील. शहराच्या राजकारणात स्थानिक आणि बाहेरचा असा अप्रत्यक्ष छुपा संघर्ष आहे. बाहेरुन आलेले नेतृत्व इथल्या स्थानिकांवर वर्चस्व करण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, तुर्तास तशी सुतराम शक्यता नाही. यासाठी आणखी किमान २५ वर्षे वाट पाहावी लागेल, असाच संदेश पवना आणि अण्णासाहेब मगर बँकेतील निवडणुकीमुळे मिळत आहे.**

# उरुळी देवाची-फुरसुंगी कचरा डेपो झाला पर्यावरणपुरक अन् हिरवागार!

## देशी वृक्षांच्या हिरवाईने बहरलेला परिसर विद्यार्थी, अभ्यासकांसाठी वेस्ट मॅनेजमेंट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तब्बल 12 हेक्टर परिसरात केलेले लाखो घनमीटर कचऱ्याचे केलेले क्यापिंग, त्यावरच उभारलेलेले हिरवेगार "अमृतवन', खाणीवरील कॉंक्रीटीकरण, साठलेल्या कचऱ्यावर केली जाणारी प्रक्रिया (बायोमायनींग), त्याद्वारे खतनिर्मिती, मिथेन निर्मिती एवढेच काय, काही प्रमाणात होणारी वीज निर्मिती अशा टप्याटप्याने उरुळी देवाची - फुरसुंगी कचरा डेपो प्रकल्प आता पर्यावरण पुरक होऊ लागला आहे.**

दुर्गंधीमुक्त, देशी वृक्षांच्या हिरवाईने बहारलेला हा परिसर विद्यार्थी, अभ्यासकांसाठी "वेस्ट मॅनेजमेंट टुरीझम' करण्याच्या दिशेने महत्वपुर्ण पाऊल टाकत असल्याचे चित्र आहे. महापालिकेच्यावतीने उरुळी देवाची - फुरसुंगी कचरा डेपो येथे अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या प्रमुख आशा राऊत, कार्यकारी अभियंता सुधीर चव्हाण, उपअभियंता राजेंद्र तिडके, अभियंता संकेत जाधव यावेळी उपस्थित होते. खेमनार यांच्यासह राऊत, चव्हाण व तिडके व जाधव यांनी प्रकल्पातील विविध कामांची व टप्यांची माहिती दिली.

महापालिकेच्या हद्दीतील निर्माण होणाऱ्या कचरा उघड्यावर न टाकता त्यावर प्रक्रिया करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या पार्श्वभुमीवर महापालिकेकडून शहरात गोळा होणाऱ्या 2200 टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी विविध ठिकाणी प्रकल्प उभारण्यात आले आहे. दरम्यान, वेळोवेळी नागरीकांचे होणारे आंदोलन, आगीच्या घटनांमुळे देवाची उरुळी - फुरसुंगी कचरा डेपो येथे उघड्यावर कचरा टाकण्याचे महापालिकेकडून बंद करण्यात आले. तसेच मागील दोन वर्षांपासून भुमी ग्रीन या संस्थेकडून साठलेल्या कचऱ्याचे बायोमायनींग करुन 21 एकर जागा रिकामी करण्यात आली. डिसेंबर महिन्यापर्यंत 20 लाख मेट्रीक टन कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया पुर्ण करण्यात येणार असल्याचे डॉ.खेमनार यांनी सांगितले.

दुसरीकडे त्यावर उभारलेल्या हलक्या झाडांमुळे हा परिसर हिरवागार दिसू लागला.

### माती, पाणी, वायु प्रदूषण मुक्तीकडे वाटचाल !


**उरुळी देवाची - फुरसुंगी कचरा डेपो येथील कचऱ्यामुळे होणारे माती व पाणी दुषीत होण्यापासून रोखण्यासाठी कचरा डेपोच्या जागेत शास्त्रीय भु-भराव (एसएलएफ) टाकण्यात आला. कचऱ्यातील रसायन माती, पाण्यात मिसळू नये, यासाठी प्लॅस्टिकचा वापर करुन एसएलएफ तयार करण्यात आले. त्यावर एकीकडे वाहिन्यांद्वारे रसायन एका ठिकाणी जमा होऊन त्यापासून होणारी मिथेन गॅस हवेत नष्ट केला जात आहे.**



# सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे खडकवासला येथे प्रचंड वाहतूक कोंडी!

। किरकटवाडी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आठ-दहा फुटांवरुन मानकरी खाली कोसळले अन्...**



सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे खडकवासला गावात प्रचंड वाहतूक कोंडी झाली असून पुणे व सिंहगड अशा दोन्ही बाजूंकडे दीड ते दोन किलोमीटर पर्यंत वाहणांच्या रांगा लागल्या आहेत. स्थानिक व परिसरातील गावांतील नागरिकांसह शेकडो पर्यटकांची वाहने या कोंडीत अडकून पडली आहेत. मनुष्यबळ कमी असल्याने हवेली पोलीस या वाहतूक कोंडीपुढे हतबल झाल्याचे दिसून येत आहे.

खडकवासला गावातील मुख्य रस्त्याचे काम सुरू असल्याने वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविण्यात आलेली आहे. बाह्यवळण रस्त्यावर दोन्ही बाजूंना स्थानिकांची वाहने उभी असतात व एका ठिकाणी अरुंद पुल असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. परिणामी दररोज सकाळ संध्याकाळ डकवासला येथील बाह्यवळण रस्त्यावर वाहतूक कोंडी होत असून तासंतास नागरिक अडकून पडत आहेत. रस्त्याच्या कामाचा वेग अत्यंत कमी असल्याने अजून किती दिवस नागरिकांचे हाल होणार? हा प्रश्न अनुत्तरित आहे.आज गुड फ्रायडे, उद्या शनिवार व परवा रविवार अशा सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे मोठ्या प्रमाणात पर्यटक खडकवासला,सिंहगड, पानशेतकडे जात आहेत. परिणामी अरुंद रस्त्यामुळे खडकवासला धरण चौक, बाह्यवळण रस्ता पूर्णपणे वाहतूक कोंडीने ठप्प झाल्याचे दिसून आले. महत्वाचे म्हणजे अपूरे मनुष्यबळ असल्याने वाहतूक कोंडी सोडविणार तरी कशी? असे पोलीस अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अर्धवट कामामुळे आणखी एक बळी!

।किरकटवाडी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अर्धवट कामामुळे खडकवासला येथील बाह्यवळण रस्त्यावर पुन्हा एक अपघात झाला असून या अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे तर एक तरुण गंभीर जखमी झाला आहे.**

अनिकेत वायकर (वय 21, रा. अहमदनगर) असे मृत तरुणाचे नाव असून विशाल पालकर(वय 21, रा. लोणावळा) असे जखमी तरुणाचे नाव आहे. जखमीवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्याचीही प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे.

वेगवेगळ्या महाविद्यालयात शिकणारे अनिकेत वायकर, विशाल पालकर व मिलिंद भिंगारदिवे हे तीन तरुण सुट्टी असल्याने दुचाकीवरुन खडकवासला येथे फिरण्यासाठी आले होते. खडकवासला येथून परत जाताना दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास खडकवासला बाह्यवळण रस्त्यावर काम रखडलेल्या पुलापासून काही अंतरावर अनिकेत व विशाल यांची दुचाकी घसरली. वीस ते तीस फूट दोघेही घसरत गेले व पुलाजवळ असलेल्या एका इमारतीच्या संरक्षक भिंतीवर आदळले. यात अनिकेत वायकर याचा जागीच मृत्यू झाला तर विशाल पालकर हा गंभीर जखमी झाला आहे.अपघाताचा आवाज ऐकून जवळच असलेले नागरिक शंकर ठाणगे , उमेश गोऱ्हे, स्वप्नील करंजावणे, अमर कांबळे व साहिल मते यांनी तातडीने दोघांनाही जवळच्या खाजगी रुग्णालयात नेले मात्र तेथील डॉक्टरांनी प्राथमिक




तपासणी दरम्यान अनिकेत याचा मृत्यू झालेला असल्याचे सांगितले. गंभीर जखमी असलेल्या विशाल पालकर याला उपचारांसाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.याबाबत माहिती मिळताच हवेली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निरंजन रणवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक डी.पी. शिंदे, सहाय्यक फौजदार दिलीप आंबेकर व पोलीस नाईक गणेश धनवे हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते.

**अरुंद पुल आणि खड्डा**

ज्या ठिकाणी अपघात झाला तेथे जुना अरुंद पूल आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने बाह्यवळण रस्त्याचे काम केले मात्र या पुलाचे काम करण्यात आलेले नाही. सदर पुल अंदाजपत्रकात नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सांगण्यात येत आहे.

सध्या खडकवासला गावातील मुख्य रस्त्याचे काम सुरू असल्याने पूर्ण वाहतूक या बाह्यवळण रस्त्यावरुन सुरू आहे. सदर अरुंद पुलाच्या ठिकाणी दररोज वाहतूक कोंडी होत असून वाहने रस्त्यावरुन खाली घसरत आहेत. त्यामुळे या ठिकाणी तातडीने नवीन पूल करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

> "दररोजच्या वाहतूक कोंडीमुळे व अपघातांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. रस्त्याला साईडपट्टी नसल्याने वाहनचालकांना अंदाज येत नाही. पुलाचेही काम रखडले आहे. अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देऊन वेळ मारुन नेत आहेत. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे निष्पाप नागरिकांचा जीव जात आहे."
>
> - सौरभ मते, माजी सरपंच, खडकवासला.

> "अपघाताबाबत माहिती मिळाली असून नागरिकांना जीव गमवावा लागत असल्याने अर्धवट कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल."
>
> - बाप्पा बहीर, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग.

> "अपघाताची माहिती मिळताच पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी जाऊन पाहणी करून आले आहेत. तसेच दवाखान्यात जाऊन जखमीचीही विचारपूस करण्यात आली आहे. अपघाताचे नेमके कारण समजू शकलेले नाही, गुन्हा दाखल करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल."
>
> - निरंजन रणवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, हवेली पोलीस ठाणे.

# शिरुर लोकसभेत भाजपा सुसाट, महाविकास आघाडी 'कोमात'!

## ठाकरे गटाचे राम गावडे भाजपात दाखल, मंगलदास बांदल यांची राष्ट्रवादीवर चाल!

। पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**शिरुर लोकसभा मतदार संघातील राजकीय पटलावर मोठ्या घडामोडी सुरू आहेत. भारतीय जनता पार्टीने महाविकास आघाडीतील मोठे मासे गळाला लावल्यामुळे राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीची तारांबळ उडलेली असून, २०२४ मध्ये राष्ट्रवादीचा विजय कठीण मानला जात आहे.**

शिंदे-फडणवीस सरकारची स्थापना झाल्यानंतर गेल्या अनेक दिवसांपासून राज्यातील नेते पक्षांतर करत आहेत. तर ठाकरे गटातील नेत्यांचे मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या पक्षात प्रवेश होत असल्याने वारंवार ठाकरे गटाला धक्के बसत आहेत. एकेकाळी शिवसेनेचा (ठाकरे गट) बालेकिल्ला असलेल्या शिरुर लोकसभा मतदार संघातील माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी शिंदे गटात प्रवेश केला. त्यानंतर आता माजी जिल्हाप्रमुख आणि कृष्णा खोरे विकास महामंडळाचे संचालक राम गावडे भाजपात प्रवेश केला आहे.

दरम्यान, राम गावडे यांच्या पक्ष प्रवेशामुळे भाजपाची शिरूर,आंबेगाव तालुक्यात ताकद वाढली असून, ठाकरे गटाचे नेते भाजपात प्रवेश करतील. त्यामुळे या तीनही मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेससह महाविकास आघाडीला धक्का बसला आहे. कारण, शिरुर, खेड व पुरंदर तालुक्यातील उद्धव ठाकरे गटाच्या तब्बल अडीचशे ते तीनशे महत्वाच्या पदाधिका-यांनी ठाकरे गटाला पर्यायाने महाविकास आघाडीला रामराम केला आहे. राष्ट्रवादीकडून पुणे जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षपदाचा कार्यकाल गाजविलेल्या आणि गटाच्या नेत्या असलेल्या जयश्री पलांडे यांचाही भाजपा प्रवेश झाला. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने झालेल्या या पक्षप्रवेशासाठी केंद्रीय मंत्री नारायण राणे तर उपस्थित होतेच, शिवाय यातील प्रमुख पदाधिका-यांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रात्री अकरा वाजता तासभर दीर्घ चर्चाही केली. त्यामुळे आगामी काळात भाजपा शिरुर मतदार संघात महाविकास आघाडीची कोंडी करणार हे निश्चित आहे.

### खासदार कोल्हे, राष्ट्रवादीसमोर आव्हान...

पुणे जिल्हा बांधकाम समितीचे माजी सभापती मंगलदास बांदल यांनी तुरुंगातून बाहेर आल्यानंतर राष्ट्रवादीला 'लक्ष्य' केले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत आपण शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या पाठिशी ठामपणे उभा राहणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. मतदार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा 'करेक्ट कार्यक्रम' सुरू केला आहे. त्यामुळे खासदार कोल्हे आणि राष्ट्रवादीसमोर आव्हान निर्माण झाले आहे. दुसरीकडे, डॉ. कोल्हे यांनी गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादीच्या संघटनात्मक कार्यक्रमांकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीत सर्व अलबेल आहे, असे दिसत नाही.

### भाजपाचे मिशन- 2024....

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने केंद्रीय मंत्री आणि प्रदेश पदाधिकाऱ्यांचे शिरुर मतदार संघातील दौरे वाढवले आहेत. पुण्यातील पर्वती मतदार संघाच्या आमदार माधुरी मिसाळ यांच्याकडे निवडणूक प्रभारी म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आगामी लोकसभा मतदार संघात उमेदवार कोण असेल? यापेक्षा 'कमळ' चिन्ह घेवून उभा असलेला उमेदवार निवडून येईल, असा दावा भाजपाकडून केला जातो. त्यामुळे भाजपाचे शिरुरमधील मिशन- २०२४ यशस्वी होते का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# 'एक गाव भोसरी'च्या फलकाची भुरळ

## पीएमटी चौकात अनावरण : छायाचित्र काढण्यासाठी भोसरीकरांनी फलकाजवळ केली गर्दी

।भोसरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**येथील पीएमटी चौकात भोसरी ग्रामस्थांद्वारे 'बारा गाव दुसरी, तेव्हा एक गाव भोसरी' अशा नामकरणाचा अनोखा फलक लावला. या फलकाजवळ भोसरीकरांनी छायाचित्र काढण्यासाठी गर्दी केली होती. भोसरीकरांद्वारे नेहमीच म्हटले जाते की 'बारा गावे दुसरी, तेव्हा एक गाव भोसरी'. या म्हणीमागे येथील कुस्ती परंपरा कारणीभूत आहे. पूर्वी भोसरीकरांचा शेतीसह दूध विक्रीचा व्यवसाय हा प्रमुख होता.**




या भोसरीतील अभ्यासक डी. डी. फुगे म्हणाले, "गाव जत्रेच्या उत्सवात पिंपरी वाघेरे, देहू, तळवडे, चिखली, मोशी, आळंदी, दिघी, चऱ्होली, कळस, पिंपळे सौदागर, पिंपळे निलख, पिंपळे गुरव आदींसह इतरही गावांमधील पहिलवानांना आखाड्यात भोसरीच्या पहिलवानांचा जोड असायचा. त्यामुळे ही म्हण प्रचलीत झाली."

### बारा गावे दुसरी, तेव्हा एक गाव भोसरी

दूध पुरवणाऱ्या गवळ्यांचे गाव म्हणूनही भोसरीला संबोधले जायचे. त्याचप्रमाणे भोसरीली यशस्वी अशी पहिलवानांचीही परंपरा आहे. पूर्वी घरटी एक पहिलवान असायचा. राज्यातील प्रत्येक भागात जत्रेच्या वेळेस भोसरीतील पहिलवान आखाडा गाजवायचे. त्याचप्रमाणे होणाऱ्या आखाड्यात इतर गावांच्या पहिलवानास भोसरीतील पहिलवानाचा जोड असायचा. त्यामुळे बारा गावे दुसरी, तेव्हा एक गाव भोसरी असे म्हणण्याचा प्रघात पडला.

# मालमत्ता कराचा ३० जूनपर्यंत भरणा करा आणि २० टक्क्यांपर्यंत सवलत मिळवा!

## मालमत्ता कर भरण्याबाबत महापालिकेचा निर्णय

। पिंपरी ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।



महापालिका प्रशासनाने २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मालमत्तांवरील सामान्य करातील विविध सवलती जाहीर केल्या आहेत. त्यात महिलांच्या नावाने असलेल्या मालमत्तेवर सामान्य करात ३० टक्के, दिव्यांगाना ५० टक्के, तर माजी सैनिकांना शंभर टक्के सवलत लागू आहे. गतवर्षी लाभ घेतलेल्या महिला, दिव्यांग आणि माजी सैनिकांना नव्याने अर्ज करण्याची गरज नाही. नागरिकांना ३० जूनपर्यंत कर भरुन सवलतीचा लाभ घेता येणार आहे.

शहरात पाच लाख ९७ हजार ७८५ मालमत्ता आहेत. त्यातून मागील आर्थिक वर्षात ८१७ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला. याच अनुषंगाने २०२३-२४ या आर्थिक वर्षात एक हजार कोटींचा टप्पा गाठण्याचे उदिष्ट विभागाने ठेवले आहे. त्यासाठी सर्व सेवा सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या आहेत. शहरातील पर्यावरण पूरक हौसिंग सोसायट्यांनी सवलतीचा लाभ घेण्यासाठी लवकरात-लवकर अर्ज करावेत. जेणेकरून अशा सोसायट्यांना आगाऊ कर भरण्याचा आणि पर्यावरण पूरक सवलतीचा एकत्रित लाभ घेता येईल.

कंपोस्टींग यंत्रणा, सांडपाणी प्रकल्प,झिरो वेस्ट संकल्पना राबविणा-या सोसायट्यांना पाच ते दहा टक्क्यांपर्यंत सवलत आहे.

## संपादकीय »

# जुनी कलागत; नवी कुरापत

***विल्यम शेक्सपिअर याच्या जगप्रसिद्ध 'हॅम्लेट' या नाटकातील राजपुत्र हॅम्लेट हा अनेक अडचणींनी वेढला गेलेला असतो. त्याच्या मनात प्रचंड वादळ उसळलेले असते. काय करावे हे त्याला कळेनासे झालेले असते. अशा वेळी त्याच्या तोंडातून शब्द निघतात, "टू बी ऑर नॉट टू बी, दॅट इज द क्वेश्चन, म्हणजे जगावे की मरावे, हा एकच प्रश्न". अशीच मानसिक अवस्था सध्या गांधी घराण्यातील राजपुत्राची झालेली आहे.***

भारत आणि चीन यांच्या सीमेवर शांतता नांदू नये आणि मुख्य म्हणजे, भारताने पूर्व आणि उत्तर सीमेबाबत क्षणभरही निश्चिंत, आश्वस्त राहू नये, याची काळजी चीन घेत असतो. सीमेवर प्रत्यक्ष किंवा इतर अप्रत्यक्ष मार्गांनी कायम कुरबुरी, कटकटी आणि कुरघोडी करत राहावे, असे चीनचे धोरण असते. त्यातूनच, चीनने नुकतीच अरुणाचल प्रदेशातील ११ स्थानांची नवी नावे मंजूर केली. यात काही गावे, पर्वतशिखरे आहेत. अरुणाचलमधील या चिनी किंवा तिबेटी भाषेतील नावांना चीन सरकारच्या संबंधित खात्याने मान्यता दिल्याचे औपचारिक पत्रक चीनने काढले आहे. भारतीय बाजूचा यावरचा प्रतिसाद विलंबाने तर आलाच पण तो पुरेसा आक्रमकही नाही. एकतर परराष्ट्र खात्याच्या प्रवक्तेपदाचे काम करणाऱ्या सनदी अधिकाऱ्याचे हे कामच नाही. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, भारताचे सरसेनापती जनरल अनिल चौहान यांनी या विषयावर तातडीने व कडक भाषेत बोलायला हवे होते. गेल्या काही वर्षांत चीनने अरुणाचल प्रदेशातील नामांतरे करण्याची ही तिसरी वेळ आहे. यापूर्वीही, भारताच्या हद्दीत आणि प्रत्यक्ष ताब्यात असणाऱ्या नदी, नाले, पर्वत, गावे यांची नावे चीनने अशीच बदलली आहेत. अशी नावे बदलण्यामागचा चीनचा मुख्य तर्क अरुणाचल प्रदेशाला दक्षिण तिबेट ठरविणे, हा आहे. तिबेट हा चीनने सरळ सरळ गिळंकृत केलेला एकेकाळचा स्वतंत्र प्रांत आहे आणि भारताने तिबेटी धर्मगुरू दलाई लामा आणि इतरांना आश्रय दिला असला तरी तिबेट हा चीनचा अविभाज्य भाग नाही, असे भारताने म्हटलेले नाही. चीन भारताबाबत असाच अनुदारपणे वागत राहिला तर भारताला तिबेटबाबतचे आपले धोरण नव्याने आखावे लागेल, यात शंका नाही. सध्या तिबेटी धर्मगुरू दलाई लामा किंवा तिबेटचे निर्वासित सरकार यांच्याशी सरकारी औपचारिक पातळीवर काही संवाद साधणे किंवा त्यांना सरकारी समारंभांमध्ये निमंत्रित करणे, एवढ्यापुरताच आपला नाराजीचा स्वर मर्यादित राहिला आहे. यापुढे, असा प्रतीकात्मक निषेध पुरेसा पडणार नाही, असे चीनच्या एकूण वर्तनावरून दिसते. भारताला तिबेटचा प्रश्न जागतिक व्यासपीठांवर नव्याने न्यावा लागेल.

# सत्य दडवण्याची पाकीट पत्रकारिता




वृत्तपत्रात योग्य व्यक्तींना भरपूर पगार मिळत असला तरी सरासरी विचार केल्यास मिळणारा पगार तुटपुंजा असतो. साखळी वृत्तपत्रे आणि इंग्रजी माध्यमात किमान चांगला पगार मिळतो मात्र तिथे कर्मचाऱ्याचे चिपाड होईपर्यंत चरकात घातले जाते. श्रमिक पत्रकारांसाठी असणाऱ्या आयोगानुसार सध्या कोणत्याच वृत्तपत्रात पगार दिले जात नाहीत आणि नवल असे आहे की अजून कोणत्याही साखळी वृत्तपत्रावर केंद्र किंवा राज्य सरकारने कारवाई केलेली नाही. पत्रकारिता करताना नोकरीची सुरक्षा नाही अन कुटुंबाचे योग्य पालनपोषण व्हावे एवढा पगारही नाही त्यामुळे गेल्या काही वर्षात या क्षेत्राकडे येणारा ओघ मंदावला आहे. विद्यापीठात दिल्या जाणाऱ्या पत्रकारितेबाबत च्या पदविका,पदव्या किंवा लघु प्रशिक्षण अनेक लोक छंद जोपासण्यासाठी प्राप्त करताना दिसतात. एवढे सगळे असले तरी पत्रकार होण्यासाठी कोणत्याही पदवीची किंवा विशेष प्रशिक्षणाची गरज नाही हे वास्तव आहे.

जिल्हास्तरावर असणाऱ्या पत्रकारितेचे दिवस फार काही आनंदात आहेत असे म्हणण्याची सोय नाही,त्यामुळे काही पत्रकार नियमित पगाराच्या व्यतिरिक्त खिश्यात पैसे कसे खेळतील यासाठी विशेष कसरती करीत असतात. त्यासाठी काही पत्रकार कुणाच्या तरी सुपाऱ्या घेतात किंवा राजकीय,सामाजिक नेत्यांचे इमेज बिल्डिंग करीत असतात त्यासाठी त्यांना ठराविक रकमेची पाकिटे मिळतात. असे करताना कधीतरी दोन पाच हजाराचे पाकीट घेणारा हा पत्रकार बदनाम केला जातो मात्र मीडिया हाऊस सत्य दडविण्यासाठी सर्रास कुणाकडून तरी घबाड मिळवितात आणि जमीन,भागीदारी किंवा अन्य स्वरूपात मोबदला घेतात त्यांना मात्र लोकशाही वाचवण्याची पारितोषिके दिली जातात, परवाच्या राहुल गांधी यांच्या शिक्षा आणि खासदारकी रद्द होण्याच्या प्रकरणात सामान्य जनतेपर्यंत सत्य बाजू जाऊ नये म्हणून सगळ्या माध्यमांचा जो काही आटापिटा सुरु होता ही सुद्धा पाकीट पत्रकारिताच म्हटली पाहिजे इथे फक्त भलेमोठे पाकीट किंवा खोका असतो.

देश किंवा राज्याच्या राजधानीत असणाऱ्या महत्वाच्या मीडिया हाऊस याना उद्योग आणि राजकीय क्षेत्रातून जसे निर्देश मिळतात तशी ही माध्यमे पळायला लागतात. बहुसंख्य श्रोत्यांच्या मेंदूचा ताबा घेणारी माध्यमे असतात टीव्ही आणि चोवीस तास चालणारी विविध भाषेतील चॅनेल्स. एखाद्या विषयावर कोट्यवधी लोकांवर तात्काळ परिणाम करायचा असेल तर त्यासाठी राष्ट्रीय वृत्त चॅनेल्सचा प्रभावी वापर केला जातो. काही वर्षांपूर्वी " कोब्रापोस्ट " ने अनेक टीव्ही चॅनेल्सच्या मालक,संपादकांचे स्टिंग ऑपरेशन करून ही बदमाशी जगापुढे आणली होती. दोन महिन्यापूर्वी राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा जबरदस्त जोश आणि प्रतिसादात देशभरात सुरु असताना लोकांनी त्याची चर्चाही करू नये यासाठी सगळ्या मोठ्या चॅनेल्सना हिंदू-मुस्लिम ,लव्हजिहाद, रशिया-युक्रेन युद्ध आणि बुवाबाबांचे चमत्कार असे विषय देऊन दिवसभर त्यावर चर्चा करून लोकांचे लक्ष विचलित करण्याचे टार्गेट देण्यात आले होते.

वरवर बघता या प्रयत्नात टीव्हीच्या श्रोत्यांना काहीच गैर वाटत नाही मात्र हे सगळे उपक्रम प्रायोजित असतात ,दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास त्या कुणाच्या तरी फायद्यासाठी प्रसारित होणाऱ्या जाहिराती असतात. गंभीर प्रश्नावरून जनतेचे लक्ष इतरत्र वळविणे किंवा त्याहीपेक्षा आम्ही मांडत असलेला विषय महत्वाचा असल्याचे श्रोत्यांच्या मेंदूवर कोरले जाते दुर्दैव असे आहे की ७० टक्के लोकांच्या ही बदमाशी लक्षात येत नाही हीच तर खरी महापाकीट पत्रकारिता असते ,बदनाम मात्र दोनपाच हजार घेणारा छोटा पत्रकार होतो. हे दोन्ही प्रकार किंवा वर्तन लोकशाहीला नेहमी कुरतडणारे असते यात शंका नाही. ज्या विषयावरून लोकांचे कल सत्ताधाऱ्यांच्या विरुद्ध जायला लागतील असे विषयच माध्यमांनी हाताळू नयेत यासाठी अलीकडे मोठमोठी पॅकेजेस ऑफर व्हायला सुरुवात झाली आहे. जाहिरात स्वरूपात असणारे हे पॅकेज नाकारण्याची हिंमत फारच कमी माध्यमे दाखवत आहेत.


अशावेळी वाचक,श्रोते यांनाच उत्तम भूमिका वठवावी लागते. पैसे देऊन आपल्या दारात येणारे दैनिक आणि पडद्यावर दिसणारे चॅनेल सातत्याने आपल्या डोक्यात कोणता मजकूर टाकत आहे याचा विचार करणारा प्रबुद्ध वाचक,श्रोता वर्ग तयार झाला पाहिजे.

# नाकर्त्या सरकारचा पाकला फटका

**माजी पंतप्रधान इम्रान खान आणि सत्ताधाऱ्यांमधील संघर्ष टोकाला पोहोचलेला असताना पाकिस्तान प्रचंड आर्थिक डबघाईला आला आहे. बेरोजगारी, गरिबी दिवसेंदिवस वाढत आहे. अमेरिकेसोबतचे पाकिस्तानचे संबंध चांगले असले, तरी त्यांची मदत घेण्याबाबत पाकिस्तानमध्ये दोन मतप्रवाह आहेत. या सर्व गोष्टींचा पाकिस्तानवर काय परिणाम होईल, याबाबत पाकिस्तानमधील**

पाकिस्तानमधील आर्थिक परिस्थिती सध्या बिकट झाली हे वास्तव असले, तरी श्रीलंकेसारखी परिस्थिती पाकिस्तानमध्ये नाही, असे म्हणता येईल. सरकारची आर्थिक परिस्थिती खालावली असली, तरी त्याचा फारसा परिणाम लोकांवर झालेला दिसत नाही. आम्ही आजही म्हणतो की सरकारची आर्थिक परिस्थिती खराब आहेच; मात्र पाकिस्तानातील लोक आनंदी आहेत. कदाचित महागाई आणखी वाढली तरी तिची झळ लोकांना बसेल असे वाटत नाही; परंतु सध्याच्या परिस्थितीला राजकीय पक्ष आणि सरकार जबाबदार आहे, हे मात्र नक्की. ही जबाबदारी सत्ताधारी स्वीकारतील किंवा स्वीकारणार नाहीत, हे पुढील काळ ठरवेल; मात्र सरकारच्या नाकर्तेपणामुळेच ही परिस्थिती ओढवली, हे खरे वास्तव आहे.

उद्योगधंद्यांना प्रोत्साहन नाही!



पाकिस्तानमध्ये उद्योगधंद्यांना अधिक प्रोत्साहन दिले नाही, हे अगदी सत्य आहे. जे काही मोठे उद्योगधंदे किंवा कारखाने आहेत, ते राजकीय लोकांशी संबंधित आहेत. त्यांची सर्व आर्थिक गणिते या राजकीय नेत्यांच्या हातात आहेत; परंतु या उद्योगधंद्यांचा पाकिस्तानच्या विकासात फारसा हातभार लागत नाही. कारण या उद्योगातून जो काही नफा, फायदा मिळतो, तो या राजकीय नेत्यांच्या माध्यमातून परदेशात जात आहे. सरकारच्या पातळीवर मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू आहे. हीच परिस्थिती खालच्या स्तरावरदेखील आहे. कोणतेही काम पैसे दिल्याशिवाय होत नाही, ही परिस्थिती आहे.

विकासाकडे सरकारचे दुर्लक्ष

पाकिस्तान कर्जबाजारी राष्ट्र होण्यामागे भ्रष्टाचार हे सर्वात मोठे कारण आहे. भ्रष्टाचाराचा थेट परिणाम पाकिस्तानच्या विकासावरही होत आहे. पाकिस्तानमध्ये सरकारच्या तुलनेत लष्कराची ताकद अधिक आहे. त्यामुळे विकासापेक्षा सुरक्षाव्यवस्थेवर मोठा खर्च केला जातो. लष्कराच्या तुलनेत शिक्षण, व्यवसाय, आरोग्याला नेहमीच दुय्यम स्थान दिले जाते. लष्कराच्या स्वतःच्या बँका आहेत, रुग्णालये आहेत. काहीही झाले तरी, ते आपल्या आर्थिक क्षमतेत हयगय करत नाही.

कर्ज मिळवण्याचा प्रयत्न

सध्या पाकिस्तान सरकार जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज मिळवण्याचा प्रयत्न करत आहे; मात्र त्यामध्ये फारसे यश येताना दिसत नाही. त्याचे कारण कर्जासाठीच्या त्यांच्या जाचक अटी.

## ॥ अभंगवाणी ॥



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बंजारा समाजाचा स्वतंत्र राजकीय पक्ष!

## राज्याच्या राजकारणात नवं वळण! ; 9 एप्रिल रोजी नांदेडमध्ये होणार स्थापना

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सध्याच्या परिस्थितीत राज्य आणि देशाच्या दृष्टीने बंजारा राजकारणाशी संबंधित एक महत्वाची घडामोड येत्या 9 एप्रिलला होऊ घातलीये. बंजारा समाज आणि राजकारण याला 'केंद्रस्थानी' मानून 'बंजारा बेस' असलेला एक नवा राजकीय पक्ष जन्माला येतोये. 'समनक' जनता पक्ष' असं या नव्या पक्षाचं नाव असणारेय. 9 एप्रिलला नांदेड जिल्ह्यातील माहूर येथे एका मोठ्या कार्यक्रमात या पक्षाच्या स्थापनेची घोषणा होणारेय. यावेळी एक जाहीर सभाही होणारेय. 'समनक' या शब्दातून बंजारा समाजाला राजकारणात समान वाटा देण्याचा 'पॉलिटिकल अजेंडा' या पक्षाच्या माध्यमातून राबविला जाणारे.**

बंजारा समाजासाठी काम करीत असलेल्या 'गोरसेना' या संघटनेचंच या नव्या राजकीय पक्षात रूपांतर होतंय. या संघटनेचे संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वात नवा पक्ष आकाराला येणारेय. संघटनेचे नांदेडमधील दिवंगत नेते कांशीराम नायक यांनी सर्वात आधी ही संकल्पना मांडली होतीय. त्यानंतर गेल्या दोन वर्षांपासून या पक्ष स्थापनेसाठी अतिशय गोपनीयपणे काम सुरू होतंय. यासाठी संदेश चव्हाण यांनी राज्य आणि देशातील हजारो बंजारा तांड्यांवर बैठकी घेतल्यात.

या पक्षाचं राजकारण 'बंजारा फोकस' असलं तरी देशभरातील मागासवर्गीय आणि भटक्या लोकांचा राजकीय दबावगट या माध्यमातून तयार करण्याचा या लोकांचा मानस आहेय. मात्र, राजकारणात असलेल्या बंजारा नेत्यांना 'पॉलिटिकल बॅकअप' देण्यासाठी नवा पक्ष काम करणारेय. बसपाचं 'कॅडर' तयार करणाऱ्या 'बामसेफ'च्या धर्तीवर या पक्षाची



रचना असणारेय अशी माहिती सूत्रांनी दिलीये.

या पक्ष स्थापनेला 'बॅकअप' देण्यामागे पडद्यामागची भूमिका संजय राठोड यांनी निभावण्याचा अतिशय विश्वसनीय माहिती आहेय. या प्रक्रियेत भाजपचे विधान परिषद आमदार निलय नाईक आणि यवतमाळ जिल्ह्यातील पुसदचे राष्ट्रवादीचे आमदार इंद्रनील नाईक यांचीही मोठी भूमिका यात आहेय. स्थापनेनंतर बंजारा मतदार निर्णायक असलेल्या तेलंगाना आणि कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीत सक्रीय भूमिका वठविण्याचा या नव्या पक्षाचा मानस आहेय. विशेष म्हणजे 10 डिसेंबर 2022 रोजीच पक्षाची निवडणुक आयोगाकडे नोंदणी करण्यात आलीय. या पक्षाची नोंद निवडणुक आयोगाकडे झालीये.

गेल्या दोन वर्षांत राज्यात संजय राठोड यांच्यानिमित्तानं बंजारा राजकारण राज्यात चर्चेला आलं होतंय. त्यात या नव्या घडामोडीनं बंजारा राजकारण एका नव्या निर्णायक वळणावर आल्याचं बोललं जातंय.

काय आहेय 'समनक'चा अर्थ?

'बंजारा' भाषेत 'समनक'चा अर्थ 'समान वाटा' असा होतो. जुन्या काळात बंजारा समाज जेंव्हा राना-वनात भटकत होताय तेंव्हा ते समुहाने कंद-मुळं जमा करायचेय. सर्व कंद-मुळे जमा झाल्यानंतर सर्वजण समुहात ते समान वाटून घ्यायचे. 'समनक जनता पक्षा'च्या स्थापनेचं हेच राजकीय सुत्रं असणारेय.

### पक्ष स्थापनेसाठी नेमकं माहूरचीच निवड

**9 एप्रिलला नांदेड जिल्ह्यातील माहूर येथे 'समनक जनता पक्षा'ची स्थापना होणारेय. या पक्षाची स्थापना नेमकं माहूरला का होत आहे?, असा प्रश्न अनेकांना पडला आहेय. माहूर हे मातृदेवतेच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी एक ठिकाण आहेय. बंजारा समाज हा आधीपासूनच मातृपूजक आहे. पोहरादेवीची जगदंबामाता हे समाजाचं दैवत आहेय. त्याच देवतेचं ठिकाण शक्तीपीठ असलेल्या माहूरची निवड यासाठी करण्यात आलीय. माहूर हे मराठवाड्यातील किनवट मतदारसंघात येतं. किनवट मतदारसंघ बंजारा समाजाच्या राजकीय ताकदीचं केंद्र राहिलं आहे. येथून समाजाचे प्रदीप नाईक हे राष्ट्रवादीच्या तिकीटावर तीनवेळा या मतदारसंघाचे आमदार राहिलेय. समाजाची मोठी ताकद असलेला यवतमाळ, हिंगोली, परभणी, नांदेड हे जिल्हे अन तेलंगाना हे राज्य येथून जवळ आहेत. त्यामूळेच जाणीवपुर्वक माहूरची निवड या पक्षाच्या स्थापनेसाठी करण्यात आलीय.**

---

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ९ एप्रिलला अयोध्या दौऱ्यावर

। अकोला।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ९ एप्रिल रोजी अयोध्या दौऱ्यावर जाणार आहे. येथे एकनाथ शिंदे प्रभू श्री रामाचे दर्शन करणार आहेत. तसेच, अयोध्या दौऱ्यात एकनाथ शिंदे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची भेट घेणार आहेत. आठ महिन्यांपूर्वी घडलेल्या सत्तांतरानंतर पहिल्यांदाच मुख्यमंत्री शिंदे अयौध्या दौऱ्यावर जाणार आहेत.

अयोध्या दौऱ्यासाठी शिवसेनेकडून ( शिंदे गट ) जय्यत तयारी सुरू आहे. या दौऱ्यात मुख्यमंत्र्यांबरोबर मंत्री, आमदार, पदाधिकारी अयोध्येला जाणार आहेत. कार्यकर्त्यांना अयोध्येला जाण्यासाठी विशेष रेल्वेही बुक करण्यात आल्या आहेत.

शिवसेना (शिंदे गट ) प्रवक्ते नरेश मस्के यांनी अयोध्या दौऱ्याआधी एक टिझर ट्विट केला आहे. यामध्ये शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, दिवंगत आनंद दिघे, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बॅनरवर दिसत आहेत. तसेच, प्रभू श्री रामाचे अयोध्येतील नवीन मंदिरही दाखवण्यात आलं आहे.

कसा असेल अयोध्या दौरा?

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ४०



# आशिष देशमुखांवर हाकापट्टीची टांगती तलवार!

## काँग्रेसकडून तीन दिवसांचा अल्टिमेटम

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वारंवार पक्षातील नेत्यांविरोधात विधान केल्याप्रकरणी आमदार आशिष देशमुख यांचं काँग्रेसमधून निलंबन करण्यात आलं आहे. पक्षानं त्यांना तीन दिवसांचा अल्टिमेट दिला असून काँग्रेसच्या शिस्तपालन समितीनं कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे.**

काँग्रेसच्या शिस्तपालन समितीनं आशिष देशमुख यांना पाठवलेल्या कारणे दाखवा नोटिशीत तीन दिवसात उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत.



**काँग्रेसच्या शिस्तपालन समितीनं आशिष देशमुख यांना पाठवलेल्या कारणे दाखवा नोटिशीत तीन दिवसांत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत.**

देशमुखांना सध्या पक्षातून निलंबित करण्यात आलं असून जर त्यांनी या कालावधीत समाधानकारक उत्तर दिलं नाही तर त्यांची पक्षातून कायमची हाकालपट्टी देखील होऊ शकते.

नाशिकच्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीवेळी काँग्रेसमध्ये झालेल्या गोंधळावरुन आशिष देशमुखांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याविरोधात भूमिका घेतली होती. त्यानंतर नाना पटोले यांनी केंद्रीय नेतृत्वाकडं देशमुख यांची तक्रारही केली होती.

त्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांची खासदारकी रद्द झाल्यानंतर देशमुख यांनी राहुल गांधींना ओबीसी समाजाची माफी मागावी अशी सूचना केली होती. देशमुखांच्या या विधानांची काँग्रेसनं दखल घेतली असून त्यांच्यावर कारवाईची प्रक्रिया सुरु केली होती.

# उत्तर प्रदेशात भाजपकडून विरोधकांना शह?

## विधान परिषदेसाठी मुस्लीम सदस्य निवडीतून नवा संदेश?

।उत्तर प्रदेश । महाईन्यूज ।

भारतीय जनता पक्षासाठी २०२४ मध्ये केंद्रात पुन्हा सत्ता मिळवायची असेल तर तो मार्ग उत्तर प्रदेशातून जातो. त्यामुळे या राज्यातील लोकसभेच्या ८० जागांवर भाजपचे विशेष लक्ष्य आहे. उत्तर प्रदेश विधान परिषदेवर राज्यपाल नियुक्त सहा सदस्यांची घोषणा नुकतीच करण्यात आली. त्यात भाजपने जातीय संतुलन राखण्यावर भर दिला आहे. दोन इतर मागासवर्गीय समाजांतील व्यक्ती तसेच दलित व पसमंदा मुस्लीम, ब्राह्मण व वैश्य अशा विविध समाजघटकांना संधी देण्यात आली आहे. भाजपने सामाजिक समीकरणांबरोबरच 'सबका साथ...' या आपल्या घोषणेला अनुसरून अलीगड मुस्लीम विद्यापीठाचे माजी कुलगुरू तारिक मन्सूर यांना वरिष्ठ सभागृहात पाठवले आहे. भाजप



हा मुस्लीमविरोधी नाही हा संदेश या नियुक्तीतून पक्षाने दिला आहे.

कोण हे तारिक मन्सूर?

उत्तर प्रदेश विधासभा निवडणुकीत गेल्या वर्षी भाजपने पुन्हा सत्ता राखली, मात्र ४०३ जागा असलेल्या उत्तर प्रदेशात विधानसभेत एकाही मुस्लीम व्यक्तीला उमेदवारी दिली नाही म्हणून टीका झाली. योगी आदित्यनाथ यांच्या नव्या मंत्रिमंडळात दानिश अन्सारी या विद्यार्थी चळवळीतून आलेल्या युवा कार्यकर्त्याला स्थान मिळाले. योगींच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत मोहसीन रझा यांना स्थान मिळाले होते.

# 'हिंडेनबर्ग' प्रकरणात जेपीसीची मागणी निरर्थक !

## स्थापन केलेल्या समितीकडून सत्य समोर येण्याची शक्यता अधिक

।नवी दिल्ली महाईन्यूज ।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे गेल्या सहा दशकांपासून भारतीय राजकारणात सक्रीय असून लोकशाहीशी संबंधित सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांचे मत महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यातच हिंडेनबर्ग प्रकरणी जेपीसीची मागणी करण्यात येत आहेत. त्यावर शरद पवार यांनी भाष्य केलं.**

हिंडेनबर्ग प्रकरणी जेपीसीची मागणी अनावश्यक असल्याचं पवार यांनी म्हटलं. जेपीसी अर्थात संयुक्त संसदीय समितीत सत्ताधारी पक्षाचे बहुमत राहिलं. त्यामुळे सत्य बाहेर येऊ शकत नाही, अस मत पवार यांनी व्यक्त केला. तर सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या समितीकडून सत्य समोर येण्याची



### औद्योगिक समूहाला लक्ष्य

**» हिंडनबर्ग प्रकरणासंदर्भात शरद पवार म्हणाले की, विरोधकांनी एका कंपनीने दिलेल्या अहवालाला गरजेपेक्षा जास्त महत्त्व दिले. या फर्मची पार्श्वभूमी कुणालाच माहित नाही, आम्ही त्यांचे नावही ऐकले नाही. या प्रकरणात एका औद्योगिक समूहाला लक्ष्य करण्यात आल्याचे दिसून येत आहे.**

शक्यता अधिक असल्याचही त्यांनी नमूद केलं. एनडीटीव्हीला दिलेल्या एक्सक्लसिव्ह मुलाखतीत ते बोलत होते.

हिंडनबर्ग प्रकरणासंदर्भात शरद पवार म्हणाले की, विरोधकांनी एका कंपनीने दिलेल्या अहवालाला गरजेपेक्षा जास्त महत्त्व दिले. या फर्मची पार्श्वभूमी कुणालाच माहित नाही, आम्ही त्यांचे नावही ऐकले नाही. या प्रकरणात एका औद्योगिक समूहाला लक्ष्य करण्यात आल्याचे दिसून येत आहे.विरोधकांच्या जेपीसीच्या मागणीबाबत ते म्हणाले की, जेपीसी नेमून प्रकरण सुटणार नाही, सर्वोच्च न्यायालयाच्या समितीतून सत्य देशासमोर येईल. या प्रकरणात जेपीसीची गरज नाही आणि त्याने फरक पडणार नाही.

'आम्ही जेव्हा राजकारणात आलो तेव्हा सरकारवर हल्लाबोल करण्यासाठी टाटा बिर्ला यांच्यावर हल्ला चढवला होतो. टाटांनी या देशासाठी किती योगदान दिले आहे, हे नंतर समोर आले. आजकाल टाटा बिर्ला यांच्याऐवजी अदानी, अंबानी यांच्यावर हल्ले होत आहेत. अदानी यांचे ऊर्जा क्षेत्रात महत्त्वाचे योगदान आहे, असंही पवार म्हणाले.

# कोळशाचा वापर कमी करण्याचा निर्धार कागदावरच!

## ऊर्जेसाठी वापर करण्यात चीन आघाडीवर

। वॉशिंग्टन ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जागतिक हवामानाच्या संकटाचा सामना करण्यासाठी कोळशाचा वापर करण्याचा जगाचा निर्धार कागदावरच राहिलेला गेल्या वर्षांत आढळून आला आहे. ही वाढ २०२१ च्या तुलनेत एक टक्का जास्त आहे. ऊर्जानिर्मितीसाठी कोळशाचा वापर २०२२ मध्ये वाढल्याचे कॅलिफोर्निया येथील 'ग्लोबल एनर्जी मॉनिटर'च्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. ही बिगर-सरकारी संस्था जगभरातील विविध प्रकारच्या ऊर्जा प्रकल्पांचा आढावा घेते.**



गेल्या वर्षी १९.५ गिगावॅट विद्युतऊर्जा निर्माण होईल इतका कोळसा जाळण्याची जगाची क्षमता वाढली. यातील बहुसंख्य म्हणजे ९२ टक्के नवे प्रकल्प चीनमधील आहेत. तापमानवाढीची मर्यादा १.५ अंश सेल्सियस इतकी राखण्यासाठी श्रीमंत देशांनी २०३० पर्यंत तर विकसनशील देशांनी २०४० पर्यंत कोळशावर आधारित विद्युत प्रकल्प पूर्ण बंद करायचा निर्धार २०१५ च्या पॅरिस करारामध्ये करण्यात आला आहे. मात्र त्याचे पालन होणे दूरच, उल्लंघन मोठ्या प्रमाणात झाल्याचे या अहवालातून दिसून येते.गेल्या वर्षभरात १४ देशांमध्ये नवीन कोळसा प्रकल्प सुरू झाले आणि आठ देशांनी कोळसा प्रकल्पांची घोषणा केली. चीनबरोबरच भारत, इंडोनेशिया, तुर्की आणि झिम्बाब्वे या देशांमध्ये नवीन कोळसा प्रकल्प सुरू झाले तसेच नवीन कोळसा प्रकल्पांची घोषणाही झाली. चीनने कोळशावर चालणारे २६.८ गिगावॅट क्षमतेचे नवीन वीजप्रकल्प सुरू केले, तर भारताने कोळशावर आधारित विद्युतऊर्जा निर्मितीची क्षमता ३.५ गिगावॅटने वाढवली.

करोनाची महासाथ आणि युक्रेनमधील युद्धामुळे अनेक देश तात्पुरते कोळशाकडे वळले आहेत असे इन्स्टिट्यूट फॉर एनर्जी इकॉनॉमिक्स अँड फायनान्शिअल ॲनालिसिसचे शंतनू श्रीवास्तव यांनी सांगितले. त्याच वेळी अमेरिकेतील १३.५ गिगावॅट क्षमतेचे कोळसा प्रकल्प गेल्या वर्षभरात बंद करण्यात आले.


# सुधा मूर्तींना पद्म पुरस्कार मिळताच, ब्रिटनच्या पंतप्रधानांची खास कमेंट

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

लेखिका आणि सामाजिक कार्यकर्ता सुधा मूर्ती यांना त्यांच्या सामाजिक कार्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नुकतच पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्याशी विवाहबद्ध झालेली त्यांची मुलगी अक्षता मूर्ती या सोहळ्याला उपस्थित होत्या.

अक्षता मूर्ती यांनी आईला तिच्या असाधारण कार्यासाठी पद्म पुरस्कार मिळाल्यानंतर इन्स्टाग्रामवर आम्हाला तुमचा अवर्णनीय अभिमान" असल्याची भावना शेअर केली. ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी यावर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

अक्षता मूर्ती यांनी लिहिले की, काल मी शब्दात व्यक्त करू शकत नाही, असा अभिमान वाटला, जेव्हा माझ्या आईला तिच्या सामाजिक



क्षेत्रातील योगदानाबद्दल राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मभूषण पुरस्कार मिळाला. यामध्ये साक्षरता वाढविण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे आणि नैसर्गिक आपत्तीनंतर देशाच्या दुर्गम भागात राहणाऱ्यांना तात्काळ साहित्य पोहोचविण्याच्या त्यांच्या कार्याचा समावेश आहे.अक्षता यांच्या पोस्टवर उत्तर देताना ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी इमोजीसह म्हटलं की, अभिमानास्पद दिवस.सुधा मूर्ती यांचे पती आणि इन्फोसिसचे संस्थापक एन. आर. नारायण मूर्ती, मुलगा रोहन मूर्ती आणि त्यांची बहीण डॉ. सुनंदा कुलकर्णी या यावेळी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्त्या आणि प्रसिद्ध लेखिका सुधा मूर्ती डिसेंबर २०२१ पर्यंत इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्ष होत्या.

## अमिषा पटेलला होऊ शकते अटक

बॉलीवूड अभिनेत्री अमिषा पटेलच्या विरोधात फसवूण केल्याप्रकरणी कोर्टानं वॉरंट जारी केलं आहे. रांची येथील सिव्हिल कोर्टानं अभिनेत्री अमिषा पटेल आणि तिचा बिझनेस पार्टनर कुणाल याला चेक बाऊंस प्रकरणात हे वॉरंट जारी केलं आहे.

माहितीसाठी इथं नमूद करतो की हे प्रकरण अडीच करोडची फसवणूक केल्या संबंधित आहे. 2018 साली 'गदर' अभिनेत्री अमिषा पटेल वर 'फॅमिली ऑफ ठाकुरगंज' चा निर्माता अजय सिंगनं ही केस केली होती. त्यानं आरोप केला होता की अमिषा पटेलनं म्युझिक व्हिडीओ बनवू असं सांगून पैसे घेतले होते पण ना म्युझिक व्हिडीओ बनला ना निर्मात्याचे पैसे अमिषा पटेलनं परत दिले.

आता रांचीच्या कोर्टानं अभिनेत्री अमिषा पटेल विरोधात वॉरंट जारी केलं आहे. सोबत कोर्टानं नाराजगी जाहीर करत म्हटलं की अभिनेत्रीच्या विरोधात समन्स देखील जारी कले आहे पण असं असताना ना अमिषा कोर्टासमोर हजर झाली ना तिचा वकील.निर्माता आणि तक्रारकर्ता अजय सिंग यानं एका मुलाखतीत सांगितलं होतं की त्यानं अमिषा पटेलसोबत ॲग्रीमेंट केलं होतं. या ॲग्रीमेंटमध्ये नमूद केल्यानुसार एका म्युझिक व्हिडीओवर काम होणार होतं.



याच्यात स्पष्ट लिहिलं होतं की अमिषाला हे पैसे जून 2018 पर्यंत व्याजासकट परत करायचे आहेत. पुन्हा पुन्हा अभिनेत्रीकडे पैशासाठी विचारणा केल्यानंतर अमिषानं अडीच कोटींचा चेक निर्मात्याला दिला होता. जो बाऊन्स झाला.

तसंच, अजय सिंग अमिषा पटेल हिचा बिझनेस पार्टनर कुणाल ग्रूमर याच्यावर धमकावण्याचा आरोप देखील केला आहे.

## अमिताभसाठी संजीवनी ठरला होता केबीसी शो..

२००० साली जेव्हा अमिताभ बच्चन यांनी टी.व्हीवरचा प्रसिद्ध क्वीझ शो 'कौन बनेगा करोडपती' होस्ट करण्यास सुरुवात केली तेव्हा ते एक सुपरस्टार होते ,ज्यांनी पहिल्यांदा छोट्या पडद्यावर काम करण्यासाठी मोठं पाऊल उचललं होतं. कितीतरी लोकांना वाटलं की अमिताभ यांचा हा निर्णय चुकीचा आहे. पण त्यावेळी अमिताभ बच्चन यांच्यासाठी तो शो म्हणजे चॉइस नव्हती..तर त्यांची गरज होती.



अमिताभ यांच्या अनेक जवळच्या लोकांनी त्यांना हा शो करण्यास नकार दिला.. त्यामध्ये त्यांची पत्नी जया बच्चन या देखील सामिल होत्या.२००८ मध्ये अबु जानी आणि संदीप खोसला यांना दिलेल्या मुलाखतीत जया बच्चन यांना केबीसी विषयी प्रश्न विचारला गेला होता की,'या शो नं रातोरात अमिताभ बच्चन यांचे नशीब कसे बदलवले..'.हैराण झालेल्या जया बच्चन उत्तर देत म्हणाल्या,'तुम्ही हा विचार करू शकत नाही की मी तेव्हा सुरवातीला नकार दिला होता. मला तर वाटत नव्हतं की त्यांनी हा शो करावा'. जेव्हा जया बच्चन यांना याचे कारण विचारले तेव्हा म्हणाल्या,'मला फक्त वाटत होतं की हा प्लॅटफॉर्म त्यांच्यासाठी योग्य नाही. ते खूप मोठे सुपरस्टार आहेत,मोठ्या पडद्यावर त्यांनी काम केले आहे,तर छोट्या पडद्यावर काम करणं त्यांच्यासाठी योग्य नाही. पण या शो मधून त्यांना एक वेगळी ओळख मिळाली'.२०२१ मध्ये जेव्हा अमिताभ बच्चननी १००० वा एपिसोड शूट केला होता,तेव्हा ते खूप भावूक झाले होते. त्यांनी म्हटलं होतं की-"जवळ-जवळ २१ वर्ष झाली. २००० साली या प्रवासाला सुरुवात झाली होती. त्यावेळी मला माहित नव्हतं..सगळे लोक म्हणत होते..तुम्ही टेलीव्हिजन करताय,मोठ्या पडद्यावरनं छोट्या पडद्यावर येताय..तुमच्या इमेजला नुकसान पोहोचेल. पण त्यावेळी वेळ अशी होती की सिनेमात काम मिळत नव्हतं. पण पहिला भाग शो चा प्रसारित झाल्यानंतर ज्या पद्धतीच्या रिॲक्शन मिळाल्या त्या पाहून वाटलं की जणू जग मुठीत आलंय".

## प्रियांका चोप्राच्या हाती लागला आणखी एक हॉलीवूड चित्रपट



अभिनेत्री प्रियांका चोप्रा सध्या विविध कारणांनी चर्चेत आहे. तिच्या आगामी प्रोजेक्ट्सकडे सर्वांचेच लक्ष वेधले गेले आहे. ती लवकरच स्पाय थ्रिलर वेब सीरिज 'सिटाडेल'मध्ये महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. या सीरिजमध्ये तिचा डॅशिंग अंदाज प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. तर आता तिच्या वाट्याला आणखी एक मोठा हॉलीवूड चित्रपट आला आहे.

प्रियांका चोप्राच्या आगामी चित्रपटांची यादी दिवसेंदिवस वाढत आहे. 'सिटाडेल' या सीरिजव्यतिरिक्त प्रियांका हॉलीवूड चित्रपट 'लव्ह अगेन'मध्येही दिसणार असून, आता तिने आणखी एक मोठा हॉलीवूड चित्रपट साईन केला आहे. विशेष म्हणजे या चित्रपटात ती WWE रेस्लर जॉन सीनाबरोबर स्क्रीन शेअर करत ॲक्शन करताना दिसणार आहे.'हेड्स ऑफ स्टेट' असे या आगामी चित्रपटाचे नाव आहे. मे महिन्यात या चित्रपटाचे शूटिंग सुरू होईल. 'नोबडी' फेम इल्या नॅस्क्युलर या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहे. तर या चित्रपटात प्रियांका चोप्रा, जॉन सीनाबरोबरच आघाडीचा हॉलीवूड अभिनेता इद्रिस एल्बाही महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसेल. या चित्रपटाची स्टार कास्ट निश्चित झाल्यानंतर जॉन सीनाने ट्वीट करत टीमचे आभार मानले. तर जॉन सीनाच्या ट्वीटला उत्तर देत प्रियांकानेही त्याचे स्वागत केले आणि त्याचे आभार मानले.

## पल-पल बदल रहा है... म्हणत सोनाली

अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने तिच्या अभिनयाने आणि नृत्याने सर्वांच्याच मनात स्वतःचं हक्काचं स्थान मिळवलं आहे. सोनाली कुलकर्णी सोशल मीडियावर सुद्धा खूप सक्रिय असते. ती अनेक व्हिडीओ आणि फोटो सोशल मीडियावर शेअर करत नेहमीच चाहत्यांचं लक्ष वेधून घेते. सोनाली वारंवार आपल्या वेगवेगळ्या लूकमधील फोटो तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर करत असते.



अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने तिच्या अभिनयाने आणि नृत्याने सर्वांच्याच मनात स्वतःचं हक्काचं स्थान मिळवलं आहे.सोनाली कुलकर्णी सोशल मीडियावर सुद्धा खूप सक्रिय असते.

सोनाली अनेक व्हिडीओ आणि फोटो सोशल मीडियावर शेअर करत नेहमीच चाहत्यांचं लक्ष वेधून घेते.

सोनाली वारंवार आपल्या वेगवेगळ्या लूकमधील फोटो तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर करत असते.

सोनालीचा हा ब्यूटीफुल लूक पाहून चाहते लाईक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत आहेत.

# लखनऊचा हैद्राबादवर दणदणीत विजय

## निकोलसने षटकार ठोकून सामना खिशात, हैद्राबादचा दारूण पराभव केला

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**६ व्या सीजनचा १० वा सामना आज शुक्रवारी सनरायझर्स हैद्राबाद आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात झाला. लखनऊच्या अटल बिहारी वाजपेयी इकाना स्टेडियममध्ये दोन्ही संघ आमने-सामने आले होते. हैद्राबादने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या हैद्राबादच्या फलंदाजांची लखनऊच्या गोलंदाजांनी दाणादाण उडवली.**

इंडियन प्रीमियर लीगच्या १क्रुणाल पांड्याने तीन तर अमित मिश्राने दोन विकेट्स घेतल्याने हैद्राबादला २० षटकांत १२१ धावांवरच मजल मारता आली होती. त्यानंतर लखनऊ सुपर जायंट्सचा कर्णधार के एल राहुल आणि क्रुणाल पांड्याने धडाकेबाज फलंदाजी केली. राहुलने ३१ चेंडूत ३५ धावांची खेळी केली. तर क्रुणालने २३ चेंडूत ३४ धावा केल्या. मात्र, निकोलस पुरनने विजयी षटकार ठोकून लखनऊने १६ षटकांत १२७ धावा करत सामना खिशात घातला.

फजलहक फारुकीने धडाकेबाज फलंदाज केली मेयर्सला १३ धावांवर बाद केलं. त्यानंतर फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या दीपक हुड्डालाही धावांचा सूर गवसला नाही. भुवनेश्वर कुमारच्या गोलंदाजीवर हुड्डा अवघ्या सात धावांवर बाद झाला. परंतु, के एल राहुल आणि क्रुणाल पांड्याने सावध खेळी करत



धावसंख्येची गती वाढवली. क्रुणाल पांड्याने आक्रमक खेळी करत २३ चेंडूत ३४ धावांची खेळी साकारली. क्रुणालच्या अष्टपैलू कामगिरीमुळं लखनऊच्या संघाला हैद्राबादवर विजय मिळवता आला. मार्कस स्टॉयनिस १० धावांवर नाबाद राहिला. हैद्राबादसाठी भुवनेश्वर कुमार, उमरान मलिक आणि फारुकीला एका विकेटवर समाधान मानावं लागलं. तर आदिल राशिदने अप्रतिम गोलंदाजी करत दोन विकेट्स घेतल्या.लखनऊकडून क्रुणाल पांड्याने हैद्राबादचा सलामीचा फलंदाज मयंक अग्रवालला ८ धावांवर बाद करत पहिला धक्का दिला. त्यानंतर अनमोलप्रीत सिंगने हैद्राबादचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला.

परंतु, सिंग ३१ धावांवर असताना पांड्याने त्यालाही बाद केलं. त्यानंतर रवी बिष्णोईच्या गोलंदाजीवर हॅरी ब्रुक अवघ्या तीन धावांवर बाद झाला अन् हैद्राबादची चौथी विकेट गेली. त्यानंतर राहुल त्रिपाठी आण वॉशिंग्टन सुंदरने सावध खेळी करत हैद्राबादच्या धावसंख्येचा आलेख चढता ठेवला होता. राहुल त्रिपाठीने ४१ चेंडूत ३५ धावांची खेळी साकारली तर सुंदरने २८ चेंडूत १६ धावा केल्या. अब्दुल समदने १० चेंडूत २१ धावा कुटल्या.

# वाढता वाढता वाढे...

## उशिरापर्यंत चालणाऱ्या आयपीएल सामन्यांच्या वेळेवर BCCI वेसण घालणार?

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**राजधानी दिल्लीत आयपीएलच्या पहिल्या सामन्याचे कव्हर करण्यासाठी इंडियन एक्स्प्रेसचा पत्रकार नरेंद्र मोदी स्टेडियमवर पोहोचला होता. गेल्या वर्षीच्या चॅम्पियन गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्याबद्दल स्थानिकांमध्ये प्रचंड उत्साह होता. सामना सायंकाळी साडेसात वाजता सुरू होणार असला तरी दुपारी ३ वाजल्यापासूनच चाहते स्टेडियमवर पोहोचू लागले. ५.३० वाजेपर्यंत जवळपास ८० टक्के प्रेक्षक आपापल्या जागेवर बसले होते कारण त्यांना संघांचा नेट सराव जवळून पाहण्याची संधी मिळते.**

### डाव संपायला १२० मिनिटे लागली

नियमांनुसार, सामना रात्री १०.३० वाजता संपला पाहिजे कारण प्रत्येक डाव ९० मिनिटांचा आहे, ज्यामध्ये वेळ संपेल. बहुतेक लोक असे गृहीत धरतात की ११ वाजेपर्यंत सामना संपेल कारण दोन डावांमध्ये २० मिनिटांचा ब्रेक देखील असतो. पण आयपीएलमध्ये सामना नियोजित वेळेवर संपला असे सहसा घडत नाही. त्यामुळे पहिला डाव संपल्यानंतर अचानक मला दिसले की बरेच चाहते, विशेषत: स्त्रिया, मुले आणि कुटुंबे सोबत असलेले चाहते घरी परतायला लागले. दिल्ली गेट मेट्रो स्टेशनवर अचानक गर्दी वाढली. चौकशी केल्यावर कळले की प्रत्येकाला वेळेपूर्वी घरी पोहोचायचे होते

.तिकीट असूनही आणि स्थानिक शहरांतील सामन्यांसाठी मैदानावर जात असतानाही मध्यरात्री १२ वाजेपर्यंत सामना सुरू असल्याने अनेकांनी घरबसल्या टीव्ही किंवा मोबाइलवर दुसरा सामना पाहणे पसंत केले. दिल्ली आणि अहमदाबादसारख्या शहरांमध्ये जिथे स्टेडियमजवळ मेट्रो रेल्वेची सुविधा आहे, तिथे रात्री उशिरापर्यंतच्या वेळेत वाढ करण्यात आली आहे, पण प्रश्न असा पडतो की ज्याला कामावर किंवा शाळा-कॉलेजला जावे लागते. त्याने स्टेडियमवर दुसऱ्या दिवशी इतका वेळ का थांबावे?




### खेळाडूंना अधिक विलंब होतो

» रात्री उशिरा संपलेल्या सामन्यांमुळे खेळाडूंनाही खूप त्रास होतो. कारण सामना संपल्यानंतर बक्षीस वितरण समारंभ, टीम मीटिंग अशा गोष्टीही केल्या जातात आणि मग हॉटेलवर पोहोचायला रात्रीचे २-३ वाजतात. एवढ्या उशिरा पोहचल्यावर आता खेळाडू किती वाजता झोपतील कारण दुसऱ्या दिवशी पुन्हा प्रवासाचा दिवस असतो. सामना खेळण्यासाठी संघांना एका शहरातून दुसऱ्या शहरात जावे लागते.

# बांगलादेशच्या 'या' फलंदाजाची विश्वविक्रमाला गवसणी

। बुलढाणा। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



आयर्लंडविरुद्ध पहिल्या कसोटी सामन्यात बांगलादेशने पहिल्या डावात ३६९ धावा केल्या. बांगलादेशकडून मुशफिकूर रहीमने १२६ आणि शाकिब अल हसनने ८७ धावांची खेळी केली. मुशफिकूर रहीमचं कसोटी क्रिकेटमधील हे १० वं शतक आहे. रहीमने शतकी खेळी करताना एक खास विक्रम केला आहे. मुशफिकूर रहीम आरर्लंडच्या विरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये शतक ठोकणारा जगातील पहिला खेळाडू ठरला आहे. याआधी अफगानिस्तानच्या रहमत शाहने आरर्लंडविरुद्ध कसोटी सामन्यात ९८ धावा धावांची खेळी केली होती. तसंच इंग्लंडच्या जॅक लीचने आयर्लंडविरुद्ध वर्ष २०१९ मध्ये झालेल्या कसोटी सामन्यात ९२ धावा केल्या होत्या.

मुशफिकूर आयर्लंडविरुद्ध शतक ठोकणारा जगातील पहिला क्रिकेटर बनला आहे. याचसोबत मुशफिकूर रहीम कसोटी क्रिकेटमध्ये बांगलादेशकडून सर्वात जास्त शतक ठोकणारा दुसरा फलंदाज बनला आहे. बांगलादेशचा मोमिनल हकने कसोटी क्रिकेटमध्ये ११ शतक ठोकले आहेत. तर मुशफिकूर रहीम बांगलादेशसाठी सर्वात जास्त धावा करणारा फलंदाजही बनला आहे. आयर्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्या इनिंगमध्ये आयर्लंडच्या संघाने २१४ धावा केल्या होत्या. त्यानंतर बांगलादेशने ३६९ धावा केल्या.त्यानंतर कर्ण शर्माने अप्रतिम गोलंदाजी करत एकाच षटकात गुरुबाज आणि आंद्रे रसलला बाद करत केकेआरला मोठा धक्का दिला. गुरबाजने ४४ चेंडूत ५७ धावांची खेळी केली पण रसेल शून्यावर बाद होऊन माघारी परतला. परंतु, शार्दुल ठाकूर आणि रिंकू सिंगने सावध खेळी करत आरसीबीच्या गोलंदांजाचा समाचार घेतला आणि धावसंख्येचा आलेख चढता ठेवला.